# मुंबई विद्यापीठ

क्र.का.प्रा.वि./ आयसीडी/२०२५- २६/३

व्यवस्थापन परिषद

**मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०२४-२५ मधील**
**दिनांक २९ मार्च, २०२५ च्या बैठकीचे इतिवृत्त**

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०२४-२५ मधील अठरावी सभा शनिवार दिनांक २९ मार्च, २०२५ तसेच सौर दिनदर्शिकेनुसार ८ चैत्र शके १९४७ रोजी सकाळी ११:३० वाजता फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई ४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली होती.

बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| अनु. क्र. | माननीय सदस्यांचे नाव | पदनाम | उपस्थिती/ अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १ | प्रा. रविंद्र कुलकर्णी ( कुलगुरु) | अध्यक्ष | उपस्थित |
| २ | प्रा. अजय भामरे (प्र-कुलगुरू) | सदस्य | उपस्थित |
| ३ | डॉ. शेषाद्री चारी | सदस्य | उपस्थित |
| ४ | डॉ. अनिल कुमार सिंग (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ५ | डॉ. शिवराम गर्जे (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ६ | डॉ. कविता लघाटे | सदस्य | उपस्थित |
| ७ | श्रीमती शेठ शितल स्वप्नील | सदस्य | उपस्थित |
| ८ | प्राचार्य दिलीप लक्ष्मण भारमल | सदस्य | उपस्थित |
| ९ | प्राचार्य दिलीप मुरलीधर पाटील | सदस्य | उपस्थित |
| १० | डॉ. अनुप नरेंद्र पळसोकर | सदस्य | उपस्थित |
| ११ | डॉ जगन्नाथ किसन खेमनर | सदस्य | उपस्थित |
| १२ | श्री. सुनिल मधुसूदन जोशी | सदस्य | उपस्थित |
| १३ | श्री. साटम मिलींद हरिश्चंद्र | सदस्य | उपस्थित |
| १४ | श्री. संदीप सिंग | सदस्य | उपस्थित |
| १५ | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| १६ | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १७ | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १८ | डॉ. प्रसाद कारंडे (कुलसचिव) | सदस्य सचिव | उपस्थित |
| १९ | (सी.ए.) हर्षल वाघ (वित्त व लेखा अधिकारी ) | निमंत्रित | उपस्थित |
| २० | डॉ. पूजा रौंदळे (संचालक, प.व.मु.मं.) | निमंत्रित | उपस्थित |

**स्वागत** : सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करून मा.अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विंनती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करून सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

## श्रद्धांजली

**सय्यद अबीद अली**

भारताचे माजी अष्टपैलू क्रिकेटपटू सय्यद अबीद अली यांचे दिनांक १२ मार्च, २०२५रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८३ वर्षांचे होते.

**रमाकांत रथ**

विख्यात ओडिशी कवी आणि माजी आयएस अधिकारी रमाकांत रथ यांचे दिनांक १६ मार्च, २०२५ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९० वर्षाचे होते.

**प्रताप जाधव**

अष्टपैलू क्रीडा संघटक प्रताप जाधव यांचे दिनांक १६ मार्च, २०२५ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६८ वर्षाचे होते.

**कांचनताई परुळेकर**

ज्येष्ठ सेवकी कांचनताई परुळेकर यांचे दिनांक २६ मार्च, २०२५ रोजी कर्करोगाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७३ वर्षाच्या होत्या.

माननीय सर्व सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहिली. तदनंतर पुढील कामकाजास सुरुवात झाली.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| १ | दिनांक १२ मार्च, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करणे. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | दिनांक १२ मार्च, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या इतिवृतास मान्यता देण्यात आली. श्री. साटम मिलिंद हरिश्चंद्र, श्रीमती शेठ शितल स्वप्नील आणि डॉ. जगन्नाथ किसान खेमनर यांनी सदर इतिवृत्तास असहमती दर्शवली. ते सभागृह सोडून निघून गेले. | |
| २ | व्यवस्थापन परिषद दिनांक २८ मे, २०२४ आणि १२ सप्टेंबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे कार्यवाही अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | व्यवस्थापन परिषद दिनांक २८ मे, २०२४ आणि १२ सप्टेंबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे कार्यवाही अहवाल व्यवस्थापन परिषदेत मान्य | |

| | | |
|---|---|---|
| ३ | Appointment of Daily Wages Staff at Jamnalal Bajaj Institute of Management Studies (Autonomous) and Permission for the implementation of New SST rates for 2022-23 to existing & newly appointed staff. | JBIMS |
| ठराव | It was resolved that Appointment of Daily Wages Staff at Jamnalal Bajaj Institute of Management Studies (Autonomous) and Permission for the implementation of New SSR rates for 2022-23 to existing & newly appointed staff be accepted from April 2025. | |
| ४ | विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या एकूण १५६ महाविद्यालयांनी अधिस्वीकृती (Accreditation)/ पुर्नअधिस्वीकृती (re- accreditation) न केल्यामुळे नियमानुसार करण्यात येणाऱ्या कारवाईची बाब व्यवस्थापन परिषदेपुढे मान्यतेसाठी व विचारार्थ ठेवण्यात येत आहे. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या एकूण १५६ महाविद्यालयांनी NAAC/ NBA अधिस्वीकृती (Accreditation)/ पुर्नअधिस्वीकृती (re- accreditation) न करणाऱ्या महाविद्यालयांच्या बाबतीत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला.<br>१) पुढील शैक्षणिक वर्षापासून संबंधित महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येऊ नये.<br>२) अधिस्वीकृती (Accreditation)/ पुर्नअधिस्वीकृती (re- accreditation) न करणाऱ्या महाविद्यालयांना १०,०००/- (दहा हजार दंड देण्यात यावा).<br>३) संबंधित विभागाने संबंधित महाविद्यालयांचे कागदपत्रे व्यवस्थित तपासून कारवाई करावी. जर कागदपत्रे न तपासता कारवाई केली तर संबंधित विभागास जबाबदार धरण्यात येईल.<br>४) प्रोफेशनल कोर्सेस चालविणाऱ्या महाविद्यालयांना NBA/ NAAC चा विकल्प आहे, जर अश्या महाविद्यालयांकडे NBA प्रमाणपत्र असेल तर त्या महाविद्यालयांवर कारवाई होणार नाही.<br>५) व्यवस्थापन परिषदेच्या ठरावाचे काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. सर्व महाविद्यालयांस एकाच वेळी नोटीस देण्यात यावी.<br>६) मुंबई विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अश्या महाविद्यालयांची यादी प्रसिद्ध करण्यात यावी.<br>७) कारवाई करताना सदर बातमीस प्रसिद्धी देण्यात यावी, जेणे करून विद्यार्थी व पालक यांना त्यांची माहिती मिळावी.<br>८) अशा महाविद्यालयांची यादी परीक्षा विभाग व प्रवेश नाव, नोंदणी विभागास देखील पाठविण्यात यावी. जेणे करून संबंधित विभाग अशा महाविद्यालयांची प्री-रजिस्ट्रेशन आणि प्री-रिकवेस्ट प्रक्रिया बंद करतील.<br>९) लीड महाविद्यालयांच्या संकेतस्थळावर अशा महाविद्यालयांची यादी प्रसिद्ध | |

| | | |
|---|---|---|
| | करण्यात यावी.<br>१०)संबंधित विभागाने कार्यवाही अहवाल दिनांक २० एप्रिल २०२५ पर्यंत सादर करावा. सदर ठराव आजच्या बैठकीत मंजूर करण्यात आला. | |
| ५ | विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या एकूण ८० महाविद्यालयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम कायदा, २०१६ च्या कलाम ९७ अन्वये "महाविद्यालय विकास समिती " (CDC) ची स्थापना न केल्यामुळे नियमानुसार करण्यात येणाऱ्या कारवाईची बाब व्यवस्थापन परिषदेपुढे मान्यतेसाठी व विचारार्थ ठेवण्यात येत आहे. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या एकूण ८० महाविद्यालयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम कायदा, २०१६ च्या कलाम ९७ अन्वये " महाविद्यालय विकास समिती " (CDC) ची स्थापना न केल्यामुळे नियमानुसार करण्यात येणाऱ्या कारवाईची बाब व्यवस्थापन परिषदेत सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती असा निर्णय घेण्यात आला की ज्या महाविद्यालयांनी "महाविद्यालय विकास समिती " (CDC) ची स्थापना केली नाही. अशा महाविद्यालयांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात यावी.<br>१) पुढील शैक्षणिक वर्षांपासून अशा महाविद्यालयांत विद्यार्थांना प्रवेश देण्यात येऊ नये.<br>२) "महाविद्यालय विकास समिती " (CDC) ची स्थापना न करणाऱ्या महाविद्यालयांना १०,०००/- (दहा हजार दंड देण्यात यावा).<br>३) "महाविद्यालय विकास समिती " (CDC) ची स्थापना न करणाऱ्या महाविद्यालयाची यादी व्यवस्थित तपासून पहावी. याबाबत न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास संबंधित विभागास जबाबदार ठरविण्यात येईल.<br>४) सर्व महाविद्यालयांना एकाच वेळी नोटीस गेली पाहिजे.<br>५) संबंधित विभागाने कार्यवाही अहवाल दिनांक २० एप्रिल २०२५ पर्यंत सादर करावा. सदर ठराव आजच्या बैठकीत मंजूर करण्यात आला. | |
| ६ | श्रीमती के. एल . तिवारी एज्युकेशन सोसायटीचे, श्रीमती के. एल . तिवारी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर या महाविद्यालयाच्या स्थलांतराबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम (ख) मधील तरतुदीनुसार नसल्यामुळे सादर महाविद्यालयाचा स्थलांतर बाबतचा प्रस्ताव 'अमान्य' करण्याची बाब मा. व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ व मान्यतेकरिता ठेवण्यात येत आहे. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | श्रीमती के. एल . तिवारी एज्युकेशन सोसायटीचे, श्रीमती के. एल . तिवारी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर या महाविद्यालयाच्या स्थलांतराबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम (ख) मधील तरतुदीनुसार नसल्यामुळे सादर महाविद्यालयाचा स्थलांतर बाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेत **अमान्य** करण्यात आला. | |
| ७ | Approval for establishment of different Centres of Studies and Research. | शैक्षणिक नेमणूक व गुणवत्ता हमी |

| | | |
|---|---|---|
| ठराव | मा. कुलगुरूंनी सभागृहास माहिती देताना अवगत केले की मुंबई विद्यापीठात विविध स्टडीज अँड रिसर्च सेंटर उपलब्ध आहेत. उदा. हिंदू स्टडीज, लोकमान्य टिळक स्टडीज अँड रिसर्च सेंटर, साहित्य रत्न अण्णा भाऊ साठे स्टडीज अँड रिसर्च सेंटर, प्रो. बाळ आपटे स्टडीज अँड रिसर्च सेंटर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल स्टडीज अँड रिसर्च सेंटर.भविष्यात असे बरेचशे स्टडीज अँड रिसर्च मुंबई विद्यापीठात आहेत.<br>स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर स्टडीज अँड रिसर्च सेंटरचा प्रस्ताव बोर्ड ऑफ डीन मधून विद्या परिषदेकडे मंजुरीसाठी पाठविला. विद्या परिषदेने तो प्रस्ताव व्यवस्थापन परिषदे कडे मंजुरी साठी पाठविला आहे.<br>याबाबत सर्वानुमते असा ठराव करण्यात आला की स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर स्टडीज अँड रिसर्च सेंटरला मंजुरी देण्यात आली. तसेच विद्यापीठाच्या आवश्यकतेनुसार अन्य स्टडीज अँड रिसर्च सेंटर मंजुरीचे अधिकार मा. कुलगुरूंना देण्यात आले. | |
| ८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, महाड येथील शिक्षकांचे प्राधिकृतबाबत. | महाविद्यालय शिक्षक मान्यता विभाग |
| ठराव | सदर बाब पुढील बैठकीत सादर करावी, असे ठरले. | |
| ९ | सिद्धार्थ विधी महाविद्यालय, फोर्ट येथील शिक्षकांचे प्राधिकृत बाबत. | महाविद्यालय शिक्षक मान्यता विभाग |
| ठराव | सदर बाब पुढील बैठकीत सादर करावी, असे ठरले. | |
| १० | मुंबई विद्यापीठ मुद्रणालयामधील कर्मचारी श्री. अशोक ए. साळवे व श्री. सत्यविजय सि. परब यांना सेवाजेष्ठतेनुसार सेवा निवृत्तीने रिक्त झालेल्या पदावर त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांक पासून पदोन्नती देण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | मुंबई विद्यापीठ मुद्रणालयामधील कर्मचारी श्री. अशोक ए. साळवे व श्री. सत्यविजय सि. परब यांना सेवाजेष्ठतेनुसार सेवा निवृत्तीने रिक्त झालेल्या पदावर त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांक पासून पदोन्नती देण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेत मान्य करण्यात आला. | |
| ११ (आयत्या वेळी आलेली बाब) | विद्यानगरी येथील न्या. रानडे भवन, येथील कक्ष क्र. ४७, यापुढे देखील Mumbai University and College Teachers Association (MUCTA) या संघटनेस वापराकरिता उपलब्ध असावे किंवा इंग्रजी अथवा भाषा शास्त्र विभागास व्याख्याना करिता उपलब्ध करून देण्यात यावे या बाबत आदेश/ मार्गदर्शनाकरिता सादर. | विद्यानगरी प्रशासकीय विभाग |

| | | |
|---|---|---|
| ठराव | याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व चर्चेअंती असा निर्णय घेण्यात आला की Mumbai University and College Teachers Association (MUCTA) या संघटनेस सदर कार्यालय देण्यात येऊ नये. शैक्षणिक उपक्रमासाठी सदर जागा देण्यात यावी. सदर संघटनेस पत्र देउन तात्काळ जागा विद्यापीठाच्या ताब्यात घेण्यात यावी. तसेच मा. कुलगुरूंनी सदर संघटनेबाबत अधिक माहिती देताना सभागृहास अवगत केले की सदर संघटना विद्यापीठाच्या कुलगुरू, प्र-कुलगुरू आणि उपकुलसचिव (शिक्षक मान्यता विभाग) यांची काही समाजमाध्यमावर वैयक्तिक बदनामी करीत आहेत. त्यासाठी उपरोक्त अधिकारी यांनी मुंबई उच्च न्यायालयात अब्रू नुकसानीचा दावा (याचिका) दाखल केला आहे. यावर होणारा खर्च देखिल ते स्वतः करत आहेत.<br>याविषयावर सभागृहातील सर्व उपस्थित सदस्यांनी मनोगत व्यक्त केले की मुंबई विद्यापीठाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बदनामी अजिबात खपवून घेतली जाणार नाही. विद्यापीठाची प्रतिमा मलीन करणाऱ्यावर कायदेशीर कार्यवाही केली गेली पाहीजे. तसेच या न्यायालयीन प्रक्रियेवर होणार खर्च देखील विद्यापीठाने केला पाहिजे. वैयक्तिक खर्च करू नये. हा ठराव आजच्या सभेत मंजूर करण्यात आला.<br>तसेच सदर सघंटनेची मान्यता रद्द करण्यात यावी. असे सर्व सदस्यांनी एकमताने सांगितले. त्यांचे कार्यालय तात्काळ खाली करण्यासाठी सदर संघटनेस पत्र देऊन विद्यापीठाने ती जागा तातडीने शैक्षणिक कामासाठी ताब्यात घ्यावी. संघटनेची मान्यता रद्द करण्यासाठी उपकुलसचिव (विधी कक्ष) यांनी आवश्यक ती कायदेशीर प्रक्रिया राबवावी. | |
| १२ | अधिसभा व व्यवस्थापन परिषद सदस्य श्रीमती शेठ शितल स्वप्नील यांनी दिनांक २५ मार्च २०२५ रोजी इ-मेल द्वारे दिनांक १२ मार्च रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे ध्वनी मुद्रण देण्याची मागणी केली होती. सदर मागणीनुसार विभागाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ व सन २०१९ चा एकरूप परिनियम क्रमांक ४ चा अभ्यास करून पड्ताळणी केली असता, असे निर्देशनास आले कि ध्वनी मुद्रण द्यावे किंवा नाही याबाबतीत तरतूद नाही. संदिग्धता आहे. सबब मार्गदर्शनासाठी मा. कुलगुरूंना टिप्पणी सादर करण्यात आली. टिप्पणी वर आलेल्या शेऱ्यानुसार सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे ध्वनी मुद्रण द्यावे किंवा नाही याबाबतीत सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती असा निर्णय घेण्यात आला की सदर ध्वनिमुद्रण बाहेर गेल्यास त्याचा दुरुपयोग होऊ शकतो. तसेच त्यामुळे व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांवर सभेमध्ये बोलताना दबाव निर्माण होऊ शकतो, त्यामुळे व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे ध्वनी मुद्रण कोणालाही देण्यात येऊ नये. | |
| १३ | दिनांक १९ मार्च, २०२५ झालेल्या ठरावाप्रमाणे टाटा आय.पी.एल. २०२५ च्या टी-२० क्रिकेटच्या सामन्यासाठी विद्यापीठ क्रीडा संकुल, मरीन लाईन्स मैदानातील गेट क्र. ४ व ५-अ, सामन्यांच्या दिवशी प्रेक्षकांसाठी खुले करून प्रेवेश देणेबाबत तसेच | क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग |

| | | |
|---|---|---|
| | बास्केटबॉल कोर्टमध्ये सॅटेलाईट व जनरेटर वाहन हे दिनांक २५/०३/२०२५ ते १६/०५/२०२५ या कालावधीत तात्पुरत्या स्वरूपात पार्किंग एकत्रित सेवाशुल्क रुपये १,३५,००,०००/- अधिक १८% जी.एस.टी. रुपये २४,३०,०००/- (एकूण रुपये १,५९,३०,०००/-) (अक्षरी एक करोड एकोणसाठ लाख तीस हजार मात्र) आकारण्यासाठी कार्योत्तर मान्यतेसाठी सविनय सादर.<br>तसेच सदरचा प्रस्ताव आगामी मा. व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्यास परवानगी मिळावी ही विनंती. | |
| ठराव | दिनांक १९ मार्च, २०२५ झालेल्या ठरावाप्रमाणे टाटा आय.पी.एल. २०२५ च्या टी-२० क्रिकेटच्या सामन्यासाठी विद्यापीठ क्रीडा संकुल, मरीन लाईन्स मैदानातील गेट क्र. ४ व ५-अ, सामान्यांच्या दिवशी प्रेक्षकांसाठी खुले करून प्रवेश देणेबाबत तसेच बास्केटबॉल कोर्टमध्ये सॅटेलाईट व जनरेटर वाहन हे दिनांक २५/०३/२०२५ ते १६/०५/२०२५ या कालावधीत तात्पुरत्या स्वरूपात पार्किंग एकत्रित सेवाशुल्क रुपये १,३५,००,०००/- अधिक १८% जी.एस.टी. रुपये २४,३०,०००/- (एकूण रुपये १,५९,३०,०००/-) (अक्षरी एक करोड एकोणसाठ लाख तीस हजार मात्र) आकरण्यासाठी कार्योत्तर मंजुरी देण्यात आली. | |
| १४ | सन २०२५-२६ या वर्षासाठी (दिनांक ०३ एप्रिल २०२५ ते २ एप्रिल २०२६ या कालावधीसाठी स्थायी शिक्षकेत्तर कर्मचारी आणि त्यांच्या कौटुंबिक सदस्यांसाठी वैद्यकीय गटविमा योजनेबाबत नेमलेल्या समितीच्या अहवालानुसार कर्मचाऱ्याच्या खात्यात एक रक्कमी रु. ६,०००/- देऊन कर्मचाऱ्यांनी आपले योगदान भरून आपापल्या सोयीनुसार स्वतःची विमा पॉलिसी काढणेबाबत | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | सदर बाबीवर साधक-बाधक चर्चा होउन काहीं बाबीचे सप्ष्टीकरण झाल्यावर वित्त व लेखा समितीने पुढील बैठकीत याबाबत निर्णय घ्यावा, असे ठरले. | |

कुलसचिवांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

May be appr

कुलसचिव

प्र- कुलगुरू

मा. कुलगुरू